स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्रमांक:कोविमं/11-12वी/योग्यता प्रमाणपत्र/1470
कोल्हापूर-416 004.
दिनांक:- 12/08/2022

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
जिल्हा:- सातारा , सांगली व कोल्हापूर.

**विषय:- इयत्ता 11वी / 12 वी शैक्षणिक वर्ष 2022-2023 साठी योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करणेबाबतच्या सूचना.**

सोबत जोडलेल्या परिपत्रकातील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. त्यानुसार योग्यता प्रमाणपत्र भरावयाच्या तारखा, विहित शुल्क व आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन परीपूर्ण प्रस्ताव मंडळाकडे निर्धारित मुदतीत सादर करावा. कोणताही पात्र विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र भरण्यापासून वंचित राहणार नाही व विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी. सर्व परिपत्रके या विभागीय मंडळाच्या www.sscboardkolhapur.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करण्यासाठी अथवा माहिती घेणेसाठी कोणत्याही पालक किंवा विद्यार्थ्याला मंडळ कार्यालयात पाठवू नये याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच योग्यता प्रमाणपत्र संबंधित परिपत्रके, तारखांमधील बदल व इतर महत्वाच्या सूचना मंडळाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी सादर करण्यात येतील. त्यानुसार आपण योग्य ती कार्यवाही करावी.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर- 416 004.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

**परिपत्रक क्र. कोविमं/योग्यता प्रमाणपत्र/1471, दि. 12 ऑगस्ट, 2022.**

**विषय:- महाराष्ट्र राज्याबाहेरील अन्य मंडळाकडून किंवा परदेशातून आलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना योग्यता प्रमाणपत्र मिळविणेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, मंडळ अधिनियम 1965 नुसार व विनियम 1977 नियम क्र.80(1) अन्वये या मंडळाव्यतिरिक्त इतर सांविधिक मंडळे, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठे यांच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ.11 वी / 12 वी प्रवेशासाठी योगयता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबतच्या सूचना व कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहेत.

### अ) योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्रतेच्या अटी :-

1) राज्य मंडळाने निर्देशित केलेल्या बोर्डाशी समकक्ष असलेल्या बोर्डामधून विद्यार्थी इ.10 वी उत्तीर्ण असावा. समकक्ष बोर्डाची यादी मंडळाच्या वेबसाईटवर www.mahahsscboard.maharashtra.gov.in देण्यात आलेली आहे.
2) विद्यार्थी इ.10 वी/ इ.11 वी परीक्षा इंग्रजी विषयासह पाच विषयामध्ये उत्तीर्ण असावा.
3) इ.11 वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### ब) योग्यता प्रमाणपत्र अर्ज घेवून जाण्याबाबतची कार्यवाही:-

परराज्यातील- परदेशातील विद्यार्थी ज्यावेळी इ.11 वी मध्ये मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतात, त्यावेळी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळामध्ये उपलब्ध असलेले योग्यता प्रमाणपत्राचे कोरे छापील अर्ज विहित शुल्क भारतीय विद्यार्थ्यांसाठी रु.200/- व परदेशातील विद्यार्थ्यांसाठी कोरे अर्ज शुल्क रु.700/- भरुन घेवून जावेत. अर्ज मंडळामध्ये सकाळी 10.30 ते 3.00 या वेळेत रोखीने उपलब्ध होतील.

### क) योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-

1) योग्यता प्रमाणपत्राचा विहित नमुन्यातील मूळ अर्ज (अर्जाची छायांकीत प्रत सादर करु नये.)
2) उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकीत प्रत स्वसाक्षांकीत (Self Attested)
3) मूळ प्रमाणपत्र संबंधित मंडळाकडून प्राप्त झालेले नसल्यास मुळ तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व त्याची प्रमाणित छायांकीत प्रत.
4) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Original Migration Certificate)
5) अर्जासोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र (Undertaking) हे विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्यात यावे.
6) परदेशी विद्यार्थ्यांनी वरील अ.क्र.1 जे 5 या कागदपत्रासह अर्जासोबत देण्यात आलेले Appendix `A` वर संबंधित शाळेचा सही शिक्का तसेच भारतीय राजदूतावास (Indian Embassy) यांची सही शिक्का असणे आवश्यक आहे.
7) योग्यता प्रमाणपत्राच्या अर्जासोबत कनिष्ठ महाविद्यालयाचे पत्र विद्यार्थ्यांच्या नावाचा तक्ता सादर करण्यात यावा.

### ड) योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाकडे सादर करण्याबाबतच्या तारखा व शुल्क खालीलप्रमाणे:-

कनिष्ठ महाविद्यालयाने आवश्यक कागपत्रांसह परिपूर्ण असलेले योग्यता प्रमाणपत्र अर्ज राज्य मंडळाने निर्देशित केलेल्या खालील तारखा आणि शुल्कासह (चलन अथवा रोखीने) एकत्रितरित्या या मंडळामध्ये सादर करावे.

**1) परिपूर्ण कागदपत्रांसह योग्यता प्रमाणपत्राच्या अर्जासोबत पाठवावयाचे शुल्क :-**

(A) अन्य मंडळाकडून येणा-या विद्यार्थ्यांसाठी नियमित शुल्क रु.500/-

(B) भारताबाहेरील अन्य देशातून येणा-या विद्यार्थ्यांसाठी (Foreign Student) नियमित शुल्क रु.700/-

**2) योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज कनिष्ठ महाविद्यालयांनी परिपूर्ण कागदपत्रांसह सादर करावयाच्या तारखा खालीलप्रमाणे:-**

(A) नियमित शुल्कासह दि.16 ऑगस्ट, 2022 ते दि.15 सप्टेंबर, 2022 पर्यंत रु.500/- प्रतिविद्यार्थी
विलंब शुल्क दि.16 सप्टेंबर, 2022 ते दि.15 नोव्हेंबर, 2022 पर्यंत(रु.500 + रु.100) प्रतिविद्यार्थी
व (रु.700 + रु.100) परदेशी विद्यार्थ्यांसाठी

(B) दि.15 सप्टेंबर, 2022 नंतर योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. परंतु प्रत्येक विद्यार्थ्यांची वैयक्तिक कागदपत्रांसह परिपूर्ण असलेली प्रकरणिका पाहून अर्ज स्विकारावा का नाही या संबंधिचा अधिकार मा. विभागीय अध्यक्षांना आहे. असे अर्ज स्विकारताना नियमित शुल्क, विलंब शुल्क इ. मंडळ नियमाप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

(C) अतिविलंब शुल्क दि.16 नोव्हेंबर, 2022 पासून दि.31 मे, 2023 पर्यंत प्रतिविद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालय रु.100/- व प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु.20/- विलंब शुल्क आकारले जाईल.

(D) दि.1 जून, 2023 पासून नियमित शुल्क + विलंब शुल्क + प्रतिदिन प्रती विद्यार्थी रु.20/ + कनिष्ठ महाविद्यालयास प्रति विद्यार्थी रु.1000/- सुट्टीचा दिवस आला तर दिलेल्या दिनांकापूर्वा अर्ज जमा करावेत अन्यथा विलंब शुल्क आकारण्यात येईल.

(E) अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी कागदपत्रांची पूर्तता प्राचार्यांनी व्यक्तीशः लक्ष घालून कागदपत्रे/ प्रमाणपत्रे इ.11 वी प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता दिनांकः- 20 जानेवारी, 2023 व इ.12 वी साठी सादर केलेले प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता दि. 05 जानेवारी, 2023 पर्यंत करणे अनिवार्य आहे.

(F) इ.11 वी साठीच्या प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता दि.20 जानेवारी, 2023 पर्यंत करावी. अन्यथा दि. 21 जानेवारी, 2023 पासून प्रतिविद्यार्थी प्रतिदिन रु.20/- प्रमाणे विद्यार्थ्यांकडून व प्रतिविद्यार्थी रु.100/- प्रमाणे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून दंड आकारण्यात येईल.

(G) इ.12 वी साठीच्या प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता दि.05 जानेवारी, 2023 पर्यंत करावी. अन्यथा दि. 06 जानेवारी, 2023 पासून प्रतिविद्यार्थी प्रतिदिन रु.20/- प्रमाणे विद्यार्थ्यांकडून व प्रतिविद्यार्थी रु.100/- प्रमाणे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून दंड आकारण्यात येईल.

(H) इ.12 वी साठी त्रुटी पूर्तता करण्यासाठी दि. 30 ऑगस्ट, 2023 ही शेवटची तारीख असून दि.30 ऑगस्ट, 2023 पर्यंत त्रुटी पूर्तता न झाल्यास विद्यार्थ्यांचा प्रस्ताव अमान्य करुन सदर विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र व परीक्षेची संपादणूक रद्द करण्यात येईल.

(I) राज्या बाहेरील किंवा परदेशातील / इतर मंडळामधून उत्तीर्ण होवून आलेले जे विद्यार्थी इ.12 वी मध्ये प्रवेश घेण्यास पात्र आहेत त्यांनी दि.15 सप्टेंबर, 2022 पूर्वीच विद्यार्थ्याकडून इ.11 वी उत्तीर्णतेचे मुळ मायग्रेशन प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांसह योग्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ शैक्षणिक संस्थेकडून स्थलांतर प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध नाही त्यांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय शिक्षण उपसंचालक यांची प्रतिस्वाक्षरी असलेल्या दाखल्याची साक्षांकीत छायाप्रत सादर केल्यास ग्राहय धरली जाईल. इतर मंडळामधून खाजगीरित्या प्रविष्ठ झालेलया विद्यार्थ्यांचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक आहे. कारण फेब्रुवारी परीक्षेसाठी आवेदनपत्र भरण्याचा दिनांकः-03 ऑक्टोबर हा कायमस्वरुपी ठरविण्यात आला आहे. मात्र एखाद्या विद्यार्थ्यांच्या पालकाच्या बदलीमुळे दि. 15 सप्टेंबर, 2022 नंतर राज्यामध्ये बदलून आल्यास अशा विद्यार्थ्यांचा प्रस्ताव विलंब शुल्क व दंडाच्या रक्कमेसह सर्व कागदपत्रांची पूर्तता असेल तरच स्विकारण्यात येईल.

**इ) योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करताना कनिष्ठ महाविद्यालयांनी खालील सूचनाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.**

1) **विभागीय शिक्षण उपसंचालकांनी इ.11 वी साठी ऑनलाईन प्रवेश दिल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थी :-**

अ) इ.10वी परीक्षा अधिकृत बोर्डाची उत्तीर्ण केलेली आहे काय ?

ब) इंग्रजी विषयासह पाच विषयात उत्तीर्ण आहे काय ?

क) इ.11 वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण आहे काय ?

ड) विज्ञान असा ठळक विषय नसला तरी त्याने घेतलेल्या विषयात विज्ञान शाखेच्या/ विषयाच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जिवशास्त्र या विषयांचा अभ्यासक्रम असलेला विषय असावा.

या चारही बाबींची संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रावरुन पडताळणी करुनच प्रवेश देण्यात यावा अन्यथा प्रवेश देण्यात येवू नये.

2) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणा-या विभागीय मंडळासाठी A.T.K.T. चा नियम लागू आहे. परंतु इतर बोर्डातील विद्यार्थ्यांना A.T.K.T. चा नियम लागू नाही. याची नोंद घ्यावी.

3) काही बोर्डाच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र एकच असतात त्याप्रमाणे त्यावर नमूद केलेले असते. ज्या बोर्डाची गुणपत्रिका स्वतंत्र देण्यात येते त्या बोर्डाचे प्रमाणपत्र अथवा तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Passing Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

4) वरील अटी व शर्तीची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश दयावा. त्यानंतर मंडळाने निर्धारित केलेल्या तारखेस विद्यार्थ्यांचा योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज मंडळाकडे सादर करावा.

5) योग्यता प्रमाणपत्राशी संबंधित माहिती अथवा इतर बाबींसाठी कनिष्ठ महाविद्यालयाचा जबाबदार प्रतिनिधी मंडळात पाठविण्यात यावा. विद्यार्थी/ पालक यांना मंडळामध्ये पाठविण्यात येवू नये.

6) ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज मंडळास सादर करुन योग्यता प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांचा इ.11 वी चा निकाल कनिष्ठ महाविद्यालयाने रोखून ठेवावा. योग्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्यास इ.12 वी मध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

7) ज्या संस्थेचे / बोर्डाचे नाव मंडळाच्या समकक्षता यादीमध्ये नाही किंवा सदर संस्थेस समकक्षता दिलेली नाही अशा संस्थेचे / बोर्डाचे प्रस्ताव संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून विभागीय मंडळास परिपूर्ण प्रस्ताव शैक्षणिक वर्षामध्ये इ.12 वी साठी दि.31 ऑगस्ट, 2022 पूर्वी व इ.11 वी साठी दि.30 नोव्हेंबर, 2022 पूर्वी या मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

8) योग्यता प्रमाणपत्र अर्ज पूर्ण भरलेला असावा. अर्जावर नमूद केलेली कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

9) ज्या मंडळाच्या नियमित विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र दिले जात नाही, अशा विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी असलेल्या दाखलयाची छायांकीत प्रत साक्षांकित केलेली ग्राहय धरली जाईल. इतर मंडळाकडून खाजगीरित्या प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक आहे.

10) राष्ट्रीय मुक्त विद्यापीठामधून (NIOS) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही वर्गाची शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी अथवा संपर्क केंद्राने दिलेला दाखला (L.C.) जोडलेला असावा.

11) योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वत: प्राचार्यांनी सही करुन प्रमाणित करावेत. योग्यता प्रमाणपत्र अर्ज प्रमाणित करताना प्राचार्यांच्या सहीचे शिक्के मारण्यात येवू नये याची कनिष्ठ महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

12) योगयता प्रमाणपत्र अर्ज मंडळास सादर करताना जेवढे अर्ज आले असतील तेवढयाच अर्जाचे योग्यता प्रमाणपत्र शुल्क चलन अथवा डी.डी. व्दारे भरावे. जास्तीची रक्कम भरण्यात येवू नये. जास्त रक्कम भरलेली असल्यास पुन:श्च योग्यता प्रमाणपत्र अर्ज जमा करताना सदर रक्कम ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

13) अन्य मंडळाकडून आलेल्या विद्यार्थ्यांना इ.12 वी चे परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी योगयता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे कनिष्ठ महाविद्यालयास बंधनकारक आहे अन्यथा परीक्षेचे आवेदनपत्र भरता येणार नाही. परंतु योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर न करता परस्पर विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरुन विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केले जातात. सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आली असल्याने यापुढे अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल व विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

14) इ.11 वी अन्य मंडळात उत्तीर्ण करुन इ.12 वी मध्ये मंडळात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्याकडे स्थलांतर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने विभागीय शिक्षण उंपसंचालकांकडून मंडळ बदलीबाबतचे परवानगी पत्र योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तदनंतर आलेले प्रस्ताव दंडनीय दराने पात्र असतील.

15) योग्यता प्रमाणपत्राचे परिपूर्ण अर्ज प्राप्त होताच मंडळात सादर करावेत. अंतिम दिनांकाची वाट पाहू नये.

16) टी.सी., गुणपत्रक, संबंधित मंडळाकडून प्राप्त ग्रेडचे गुणात रुपांतर केलेली प्रत व प्रमाणपत्र ( संबंधित मंडळाकडून मूळ प्रमाणपत्र प्राप्त नसल्यास मूळ तात्पुरते प्रमाणपत्र म्हणजेच Provisional Certificate ची साक्षांकित प्रत (सदरील प्रती संबंधित कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक / प्राचार्य यांनीच प्रमाणित केलेली असावी.).

17) शैक्षणिक खंड (गॅप) असेल तर अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशास शैक्षणिक खंडाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) देणे आवश्यक आहे.

18) प्रस्तावावरील विद्यार्थ्यांचा फोटो संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणित केलेला असावा.

19) कोणताही पात्र विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी. जर विद्यार्थ्यांचा योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झाला नाही अथवा पाठविण्यात आला नाही अशी बाब या मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याची कारवाई केली जाईल. योग्यता प्रमाणपत्राआभावी विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

20) योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर केल्यानंतर इ.11 वीत अथवा इ.12 वीत शिकत असताना कॉलेजमधून नाव कमी केल्यास तसे त्वरीत मंडळास पत्राव्दारे कळवावे.

21) योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाकडे सादर करताना इ.11 वी, इ.12 वी व खाजगी विद्यार्थ्यांच्या नावांची माहिती स्वतंत्र तक्त्यात भरुन सादर करावी. एकत्रित यादी सादर करु नये, अशी माहिती स्विकारण्यात येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर करण्यात येत आहेत, अशांचीच नावे सोबतच्या तक्त्यात सादर करावीत.

22) इतर मंडळे व परदेशी मंडळे/विद्यापीठ ज्यांचे नाव कार्यालयीन समकक्षता यादीत नाही अशी मंडळे व परदेशी मंडळ/वीद्यापीठ यांचे इ.10 वी चा अभ्यासक्रम योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. तसेच याबाबतचे विहित शुल्क भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

23) विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे प्रस्ताव नाकारणे

1. विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.
2. पडताळणीमध्ये अयोग्य ठरविलेले अर्ज प्रमाणपत्रासाठी पात्र नाहीत, असे कळविण्यात येईल.
3. त्यानुसार अशा विद्यार्थ्यांची यादी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्यात येईल.
4. अपात्र विद्यार्थ्यांची यादी मंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर इ.11 वी किंवा इ.12 वीत दिलेला प्रवेश तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही करावी.
5. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आठ दिवसांत मंडळ कार्यालयात सादर करावा.

24) सांकेतांक क्रमांक उशिरा प्राप्त झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केल्यास इ.11 वी पासूनचा दंड भरावा लागेल. त्यात कोणतीही सवलत मिळणार नाही.

उपरोक्त परिपत्रक कनिठ महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणावे.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर- 416 004.

प्रति:-
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातार ा / सांगली / कोल्हापूर.
प्रत माहितीस्तव अग्रषित:-
1) विभागीय शिक्षण उपसंचालक, कोलहापूर विभाग, कोल्हापूर.
2) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातार ा / सांगली / कोल्हापूर.

# REGISTER FOR THE ELIGIBILITY YEAR 2022-2023

College Index No.____________________ Phone No.________________________ Email ID__________________________________________

| Sr. No. | Name of the Candidate | Name of the Board | Indian/ Foreigner | S.S.C. Statement of Marks | School Leaving Certificate | S.S.C. Passing Certificate | Original Migration Certificate | XI Statement of Marks | Appendix 'A' | Verification (For Private Candidates only) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

सूचना :-

1. इ.11वी/12वी व खाजगी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र तक्ता भरावा.
2. क्रमांक 1 ते 7 कॉलम भरताना कागदपत्रे असल्यास Yes व नसल्यास No लिहावे.
3. ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करत आहात अशा विद्यार्थ्यांचीच नावे उपरोक्त तक्त्यात भरावीत.

Signature & Seal

Head of Junior College

Mobile No.____________________